ePaper
| वर्ष - 7 । अंक - 217 | UDYAM-MH-26-0158827 |
# महाईन्यूज™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com । शुक्रवार, दिनांक 15 डिसेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## विधानसभेत आव्हाडांकडून जरांगेंची पाठराखण तर भुजबळांवर हल्लाबोल




**आतील पानांत**

- सतीश-रॉड्रिग्जची शानदार खेळी!
- झिम्मा 2'चा नवा ट्रेलर आऊट
- नजर चुकीने झाली निलंबनाची घोषणा
- निवडणुकांसाठी भाजपचा मेगाप्लॅन


# रेल्वे विस्तारासाठी "डीपीआर"!

## खासदार श्रीरंग बारणे यांचा पुढाकार : रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांना मागणी

।पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पनवेल ते पुणे रेल्वे मार्गावर लोकल आणि वेगवान रेल्वे गाड्या धावण्यासाठी नवीन रेल्वे मार्ग बनविण्याची आवश्यकता आहे. मार्ग विस्तारीकरण करण्याकरीता नव्याने डीपीआर तयार करावा. या मार्गावर लोकल सुरु झाल्यास रेल्वेला फायदा होईल. वंदे भारतला लोणावळ्यात आणि लोणावळा आणि कर्जत स्थानकांवर विविध एक्सप्रेस गाड्यांना थांबा देण्याची मागणी शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी केली.**



मावळ लोकसभा मतदारसंघातील रेल्वेच्या प्रश्नांबाबत राज्यमंत्री रावसाहेब दानवे आणि रेल्वे विभागाचे कार्यकारी संचालक देवेंद्र कुमार यांच्या बरोबर खासदार बारणे यांची बैठक झाली. मावळमधील रेल्वे संदर्भातील विविध प्रश्नांवर सकारात्मक चर्चा झाली. पनवेलमध्ये आंतरराष्ट्रीय विमानतळ झाले आहे. तसेच पनवेल ते कर्जत रेल्वे मार्गाचे निर्माणीकरणाचे काम सुरु आहे. कर्जत ते लोणावळा दरम्यानच्या मार्गालगत नवीन रेल्वे लाईनचा सर्व्हे, सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) बनवावा. पुणे ते लोणावळा दरम्यान तिसऱ्या, चौथ्या ट्रॅकला सहा वर्षांपूर्वी मान्यता मिळाली. परंतु, अद्यापही कामाला सुरुवात झाली नाही. महारेल काम सुरु करण्यासाठी तयार असून रेल्वे मंत्रालयाच्या सहकार्याची त्यांना आवश्यकता आहे. पनवेल ते पुणे दरम्यान रेल्वे मार्गावर लोकल आणि वेगवान रेल्वे गाड्यांसाठी नवीन रेल्वे मार्गाची निमिर्ती करावी. पनवेल ते पुणे दरम्यान लोकल रेल्वे सुरु केल्यास आर्थिक फायदा होईल.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या महत्वकांक्षी योजनेतून स्वदेश निर्मित वंदे भारत एक्सप्रेस सुरु केली आहे. मुंबई-पुणे-सोलापूर दरम्यान एक्सप्रेस धावत आहे. मुंबई, ठाणे, कल्याणनंतर थेट पुण्यात थांबा आहे. मावळ लोकसभा मतदारसंघात वंदे भारतला एकाही ठिकाणी थांबा नाही. लोणावळा मोठे पर्यटन स्थळ आहे. लाखोंच्या संख्येने पर्यटक लोणावळ्यात येतात. त्यामुळे वंदे भारतला लोणावळ्यात थांबा देण्याची मागणी खासदार बारणे यांनी केली.

### पुणे-लोणावळा : दुपारच्या वेळेत लोकल सुरु करा..

कोरोना साथ सुरु होण्यापूर्वी पुणे-लोणावळा दरम्यान लोकल गाड्यांचे संचालन व्यवस्थित सुरु होते. कोरोना साथीच्या कालावधीत रेल्वेची सेवाच बंद करण्यात आली. कोरोनानंतर आता देशात पूर्वीप्रमाणे सर्व रेल्वे सुरु झाल्या आहेत. कोरोना साथीच्या अगोदर पुणे-लोणावळा दरम्यान सकाळी साडे अकरा ते दुपारी अडीच वाजताच्या कालावधीत दोन लोकल गाड्या चालवल्या जात होत्या. त्या गाड्यांचे संचालन आता बंद आहे. पुणे-लोणावळा मार्गावर विद्यार्थी, महिला, शेतकरी, नोकरदार, पर्यटक अशा अनेक घटकातील हजारो प्रवासी प्रवास करतात. तळेगाव आणि पिंपरी-चिंचवड मधील औद्योगिक वसाहतींमध्ये दुसऱ्या शिफ्टच्या कर्मचाऱ्यांना कामावर येण्यासाठी साडेअकरा ते अडीच वाजताच्या कालावधीत येणाऱ्या लोकलचा मोठा फायदा होतो. त्यामुळे दुपारच्या वेळेत लोकल गाड्या सुरु करण्याची मागणी खासदार बारणे यांनी केली.

### लोणावळा, कर्जत रेल्वे स्थानकांवर 'या' गाड्यांना थांबा द्या..

कोरोनानंतर सर्व लांबच्या रेल्वे गाड्या सुरु झाल्या आहेत. परंतु, कोरोनापूर्वी असलेले थांबा बंद केले आहेत. त्यामुळे प्रवाशांचे हाल होत आहेत. विद्यार्थी, महिला, शेतकरी, व्यापारी, पर्यटकांचे अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे कर्जत रेल्वे स्थानकांवर कोयना, हैद्राबाद, कोणार्क, चेन्नई, गदक, सिद्धेश्वर, कन्याकुमारी, कोल्हापूर-अहमदाबाद, मुंबई-पधानपूर, कोल्हापुर-मुंबई सह्याद्री एक्सप्रेस आणि पुणे-कर्जत पैसेंजर या 11 गाड्यांना थांबा द्यावा. तसेच लोणावळा स्थानकावर मद्रास सीएसएसटी सुपरफास्ट, एलटीटी सीबीइ, अहमदाबाद हमसफर, एलटीटी मद्रास, एनसीजे सीएसएमटी, जोधपुर, हुसैन सागर एक्सप्रेस, मुंबई सीएसएमटी सुपरफास्ट, दादर पदुचेरी, सीएसएमटी चेन्नई एग्मोरे मेल, सिद्धेश्वर आणि मुंबई-लातुर एक्सप्रेसला पूर्वीप्रमाणे थांबा देण्याची मागणीही खासदार बारणे यांनी केली.

---

# तळवडे दुर्घटनेतील आणखी दोघांचा मृत्यू!

## मृतांची संख्या 11 वर : आयुक्त शेखर सिंह यांनी व्यक्त केला शोक

।पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड परिसरातील तळवडे येथील कारखान्यात झालेल्या आग दुर्घटनेत जखमी रुग्ण प्रियंका यादव (वय ३२ वर्षे) यांचे रात्री पावणे दोन वाजता तर अपेक्षा तोरणे (वय १८ वर्षे) यांचे सकाळी साडे सहा वाजता ससून रुग्णालयामध्ये उपचारादरम्यान आज निधन झाले आहे. मृतांबद्दल आयुक्त शेखर सिंह यांनी शोक व्यक्त केला आहे. मनाला वेदना देणारा हा प्रसंग असुन कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत, अशा शब्दात त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या असुन मृतांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.**



### रुग्णालयामध्ये मदत कक्ष सुरु

उपचारासाठी दाखल असलेल्या तळवडे आग दुर्घटनेतील जखमी रुग्णांना तसेच त्यांच्या नातेवाईकांना आवश्यक मदतीसाठी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने ससून रुग्णालयामध्ये मदत कक्ष सुरु करण्यात आला आहे. यामध्ये वैद्यकीय अधिकारी आणि २ मदतनीस यांची २४X७ नेमणूक करण्यात आली आहे.

तळवडे तेथील एका कारखान्यामध्ये दि. ८ डिसेंबर रोजी घडलेल्या आग दुर्घटने ६ जणांचा घटनास्थळी मृत्यू झाला होता तर १० जण जखमी झाले होते. जखमींना पुढील उपचारांसाठी तातडीने पुणे येथील ससून रुग्णालयात पाठविण्यात आले होते. त्यातील प्रतिक्षा तोरणे (वय १६ वर्षे) आणि कविता राठोड (वय ४५ वर्षे) यांचे दि.९ डिसेंबर रोजी तर शिल्पा राठोड (वय ३१ वर्षे) यांचे दि.१० डिसेंबर रोजी ससून रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले. तर उर्वरीत जखमींपैकी आज २ जणांचे उपचारादरम्यान निधन झाले आहे.

# पुणेकर मतदानाला मुकणार!

## पोटनिवडणूक घेण्याचे न्यायालयाने दिले आदेश

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**खासदार गिरीश बापट यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या जागी पोटनिवडणूक घेण्याचे आदेश उच्च न्यायालयाने दिले आहेत. त्यानुसार भारत निवडणूक आयोगाने ५ जानेवारी २०२३ या तारखेच्या आधी निवडणूक जाहीर केल्यास तब्बल ३० हजार पुणेकर मतदानापासून वंचित राहणार आहेत. त्याचे कारण मतदारयादी आहे. पुणे लोकसभा पोटनिवडणूक जाहीर झाल्यास नेमकी कोणती मतदारयादी वापरायची, याचा निर्णय प्रशासनाला घेता आलेला नाही.**



मतदारयादी तयार करण्याची प्रक्रिया निरंतर सुरू असते. दरवर्षी देशभरातील प्रत्येक जिल्ह्यातील मतदारांची मतदारयादी प्रसिद्ध होत असते. मात्र, लोकसभा किंवा विधानसभा निवडणुकांच्या काळात या मतदारयादीला महत्त्व प्राप्त होत असते. या कार्यक्रमानुसार ५ जानेवारी २०२३ रोजी पुणे, पिंपरी-चिंचवड आणि ग्रामीण भागातील मतदारांची मतदारयादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यामध्ये पुणे लोकसभा मतदारसंघातील वडगाव शेरी (चार लाख ३३ हजार २२), शिवाजीनगर (दोन लाख ७४ हजार १०३), कोथरूड (तीन लाख ९१ हजार ५२०), पर्वती (तीन लाख ३० हजार ८१९), पुणे कॅन्टोन्मेंट (दोन लाख ६७ हजार ४८०) आणि कसबा पेठ (दोन लाख ७५ हजार ४२८) मतदार होते. नव्या वर्षाच्या सुरुवातीला देशभरात सार्वत्रिक लोकसभा निवडणूक होणार आहे. त्याची तयारी जिल्हा निवडणूक शाखेने सुरू केली आहे. त्यानुसार मतदारयादी अद्ययावतीकरणाचा कार्यक्रमही हाती घेतला आहे. २८ ऑक्टोबर रोजी पुणे, पिंपरी-चिंचवड आणि उर्वरित ग्रामीण भागातील मिळून एकूण २१ विधानसभा मतदारसंघांची प्रारूप मतदारयादी जाहीर करण्यात आली आहे. या यादीनुसार या सहाही विधानसभा मतदारसंघांमध्ये २७ हजार ५० मतदार नव्याने मतदार समाविष्ट झाले आहेत. तसेच प्रारूप यादी प्रसिद्ध झाल्यानंतर एक लाखांपेक्षा जास्त मतदार नोंदणीचे अर्ज जिल्हा निवडणूक शाखेला प्राप्त झाले आहेत. त्यामध्ये पुणे लोकसभा मतदारसंघातील नव्या मतदारांचेही अर्ज आहेत. त्यामुळे २७ हजार ५० मतदारांमध्ये आणखी नव्या मतदारांची भर पडणार आहे. या पार्श्वभूमीवर ५ जानेवारी २०२४ रोजी लोकसभा निवडणुकीत वापरण्यात येणारी मतदारयादी प्रसिद्ध होणार आहे. मात्र, त्यापूर्वीच पुणे लोकसभा पोटनिवडणूक जाहीर झाल्यास ५ जानेवारी २०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली मतदारयादी वापरण्यात येईल. परिणामी पुणे लोकसभा मतदारसंघातील नव्याने मतदार झालेल्या सुमारे ३० हजार मतदारांना मतदानाला मुकावे लागणार आहे.मतदारयादी तयार करण्याची प्रक्रिया निरंतर सुरू असते. दरवर्षी देशभरातील प्रत्येक जिल्ह्यातील मतदारांची मतदारयादी प्रसिद्ध होत असते. मात्र, लोकसभा किंवा विधानसभा निवडणुकांच्या काळात या मतदारयादीला महत्त्व प्राप्त होत असते. या कार्यक्रमानुसार ५ जानेवारी २०२३ रोजी पुणे, पिंपरी-चिंचवड आणि ग्रामीण भागातील मतदारांची मतदारयादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यामध्ये पुणे लोकसभा मतदारसंघातील वडगाव शेरी (चार लाख ३३ हजार २२), शिवाजीनगर (दोन लाख ७४ हजार १०३), कोथरूड (तीन लाख ९१ हजार ५२०), पर्वती (तीन लाख ३० हजार ८१९), पुणे कॅन्टोन्मेंट (दोन लाख ६७ हजार ४८०) आणि कसबा पेठ (दोन लाख ७५ हजार ४२८) मतदार होते.

### पुणेकर मतदानापासून वंचित

नव्या वर्षाच्या सुरुवातीला देशभरात सार्वत्रिक लोकसभा निवडणूक होणार आहे. खासदार गिरीश बापट यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या जागी पोटनिवडणूक घेण्याचे आदेश उच्च न्यायालयाने दिले आहेत. त्यानुसार भारत निवडणूक आयोगाने ५ जानेवारी २०२३ या तारखेच्या आधी निवडणूक जाहीर केल्यास तब्बल ३० हजार पुणेकर मतदानापासून वंचित राहणार आहेत. त्याचे कारण मतदारयादी आहे. पुणे लोकसभा पोटनिवडणूक जाहीर झाल्यास नेमकी कोणती मतदारयादी वापरायची, याचा निर्णय प्रशासनाला घेता आलेला नाही. पुणे लोकसभा मतदारसंघातील नव्या मतदारांचेही अर्ज आहेत. त्यामुळे २७ हजार ५० मतदारांमध्ये आणखी नव्या मतदारांची भर पडणार आहे.

# गोष्टी सांगण्यात पुणेकर अव्वल, चीनचा विक्रम मोडला

## 3 हजार पालकांनी एकाचवेळी छान छान गोष्टी सांगितल्या!

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गोष्ट सांगण्याचा विश्वविक्रम भारताच्या नावावर (GUINNESS WORLD RECORD) नोंद झालाय. पुण्यातील एस पी कॉलेजच्या मैदानावर तीन हजारांहून अधिक पालकांनी त्यांच्या पाल्यांना गोष्ट सांगण्याचा विश्वविक्रम केलाय. गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये या विश्वविक्रमाची नोंद झाली आहे. आतापर्यंत हा विश्वविक्रम चीनच्या नावावर होता. चीनमधे एकाचवेळेस बावीसशे पालकांनी त्यांच्या मुलांना एकाचवेळी गोष्टी सांगितल्या होत्या.**

नॅशनल बुक ट्रस्ट मार्फत आयोजित पुस्तक महोत्सवाच्या निमित्ताने पुण्यातील एस पी कॉलेजच्या मैदानावर गोष्ट सांगण्याच्या या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. पालकांनी आपल्या मुलांना तीन मिनिटं पुस्तक वाचून दाखवलं आहे. पुण्याला शिक्षणाचं माहेरघर म्हटलं जातं, या रेकॉर्डमुळे पुण्यानं आता जगाच्या पातळीवर आपलं नाव उंचावलं आहे. शिक्षणाचे माहेरघर असणाऱ्या पुणे शहरात 'वर्ल्ड बुक कॅपिटल' होण्याची क्षमता आहे. या विश्वविक्रमाच्या निमित्ताने युनेस्कोचे निकष पूर्ण करण्याचा महापालिकेकडून प्रयत्न



करण्यात आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या मन की बातमधून लहान मुलांना कथा किंवा गोष्टी सांगण्याचे फायदे सांगितले आहे. याद्वारे मुलांना आपल्या संस्कृती आणि इतिहासबद्दल माहिती मिळून ती लक्षात राहते. याचे शैक्षणिक फायदे सुद्धा आहे. याला अनुसरूनच पालकांकडून आपल्या पाल्यांना गोष्टी सांगण्याचा उपक्रमआयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमात पुणे महापालिकेच्या शाळा मोठ्या संख्येने सहभागी झाल्या आहेत. त्याचबरोबर डेक्कन एज्युकेशन सोसायटी, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीसह अनेक शिक्षण संस्थांच्या शाळेतील विद्यार्थी सहभागी झाले आहेत. यावेळी सुमारे 3 हजारांहून आधिक पालकांनी आपल्या पाल्यांना विविध गोष्टी, कथा वाचून दाखवल्या आहे यापूर्वीचा, पालकांनी आपल्या पाल्यांना गोष्टी किंवा कथा सांगण्याचा विश्वविक्रम चीनच्या नावे असून, तो तोडण्यात पुणे यशस्वी ठरलं आहे. वर्ल्ड बुक कॅपिटल हा युनेस्कोचा एक उपक्रम असून, तो 23 एप्रिलपासून सुरू होता. शहरामध्ये वाचन संस्कृती रुजवण्यासाठी हा महत्त्वपूर्ण पाया असतो. या अंतर्गत शहाराला एका वर्षासाठी पुस्तकांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि वाचनाला प्रोत्साहन देण्यासाठी वर्ल्ड बुक कॅपिटलचा दर्जा देण्यात देतो. युनेस्को वर्ल्ड बुक कॅपिटल म्हणून नियुक्त केलेली शहरे ही सर्व वयोगटातील वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी आणि युनेस्कोची मूल्ये सामायिक करण्याच्या उद्देशाने उपक्रम राबवतात. गोष्ट सांगण्याचा विश्वविक्रम भारताच्या नावावर (Guinness World Record) नोंद झालाय. पुण्यातील एस पी कॉलेजच्या मैदानावर तीन हजारांहून अधिक पालकांनी त्यांच्या पाल्यांना गोष्ट सांगण्याचा विश्वविक्रम केलाय.

# इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पाला ‘बुस्टर डोस’!

## आमदारमहेशलांडगेयांचापाठपुरावा: अमृत-2अभियानामध्येप्रकल्पाचासमावेश

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**इंद्रायणी नदी प्रदूषणावर उपाययोजना करण्यासाठी राज्य सरकारने पुढाकार घेतला असून, केंद्र सरकारच्या अमृत-२ अभियानामध्ये इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पाचा समावेश करण्यात आला आहे. या योजनेंतर्गत एकूण ५२६ कोटी रुपयांची निधी उपलब्ध होणार असून, राज्यस्तरीय सुकाणू समितीच्या शिफारसीनुसार कार्यवाही करावी, अशा सूचना राज्याच्या नगरविकास विभागाने दिल्या आहेत.**



> इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पासाठी २०१४ पासून राज्य सरकार, महापालिका प्रशासनाकडे वेळोवेळी पाठपुरावा करीत आहे. २०१७ मध्ये महापालिकेत भाजपाची सत्ता आली. त्यावेळी या प्रकल्पाला गती देण्याची भूमिका घेतली. २०१९ मध्ये राज्यात सत्ताबदल झाला. त्यामुळे हा प्रकल्प पुन्हा लांबणीवर पडला. आता राज्यात आणि केंद्रात एकाच विचाराचे सरकार आहे. त्यामुळे नदी सुधार प्रकल्पाला चालना द्यावी, अशी ठाम भूमिका हिवाळी अधिवेशनात मांडली. त्याला सरकारने सकारात्मक प्रतिसाद दिला. अमृत-२ च्या माध्यमातून नदी सुधार प्रकल्पाला निधी उपलब्ध होईल. पर्यावरण ना हरकत दाखला आणि केंद्र सरकारच्या मंजुरीसाठी आम्ही शासनस्तरावर पाठपुरावा करणार आहोत.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा,**

हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर इंद्रायणी नदी प्रदूषणाचा विषय चर्चेत आला. आमदार महेश लांडगे यांनी विधिमंडळ सभागृहात लक्षवेधीद्वारे राज्य सरकारचे लक्ष वेधले. तसेच, ‘व्हीजन- २0२0’ अंतर्गत आमदार लांडगे यांनी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली ‘नमामी इंद्रायणी’ हा प्रकल्प हाती घेतला होता. २०१९ मध्ये महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात या प्रकल्पाकडे दुर्लक्ष झाले.

दरम्यान, राज्यात महायुतीचे सरकार स्थापन झाले. ऑक्टोबर-२०२२ मध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी श्रीक्षेत्र आळंदी येथे दौरा केला होता. त्यानंतर दोन दिवसात राज्य उच्चाधिकार समितीची बैठक झाली. त्यामध्ये पिंपरी-चिंचवड महापालिका आणि पुणे प्रदेश महानगर विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) यांनी सादर केलेल्या ‘डीपीआर’ला तत्वता: मान्यता देण्यात आली. तसा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठवण्यात आला आहे.

तसेच, राज्य सरकारच्या नगर विकास विभागाने केंद्र सरकार पुरस्कृत अमृत-२.० योजनेतील राज्य जलकृती आराखडा तयार केला. त्यामध्ये इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पाचा समावेश केला असून, ५२६ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करण्यात येणार आहे.

सदर प्रस्ताव केंद्र शासनाच्या शिखर समितीकडे मान्यतेसाठी पाठवण्यात आला आहे. तसेच, या प्रकल्पासाठी महराष्ट्र जीवन प्राधिकरणकडून तांत्रिक मान्यता घेवून आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करुन शासनास सादर करावे, असे आदेश नगर विकास मंत्रालयाने महापालिका प्रशासनाला दिले आहेत. त्यामुळे निविदा पूर्व प्रक्रियेला गती मिळाली आहे.

---

# पिंपळे गुरवमधील रस्त्यांच्या काँक्रिटीकरणाला ‘गती’

## कॉलन्यांमध्ये चार महिन्यांत रस्ते होणार चकाचक; भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्याहस्ते भूमिपूजन

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील नागरिकांना चांगले रस्ते आणि पायाभूत सुविधा मिळाल्या पाहिजेत. यासाठी प्रशासनाने सकारात्मक दृष्टीकोणातून कार्यवाही करावी. पिंपळे गुरव आणि परिसरातील गृहनिर्माण सोसायटी, कॉलनींमधील अंतर्गत रस्त्यांच्या काँक्रिटीकरणाचे काम आगामी चार महिन्यात पूर्ण करावे, अशी सूचना भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी केली.**

‘ड’ क्षेत्रीय कार्यालयाच्या अंतर्गत पिंपळे गुरव येथील भीमाशंकर कॉलनी, गणेशनगर, विजयराज कॉलनी येथील अंतर्गत रस्त्यांचे काँक्रिटीकरण कामाचे उद्‌घाटन भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी माजी नगरसेवक सागर आंगोळकर, शशिकांत कदम, माजी नगरसेविका उषा मुंडे, माजी स्वीकृत सदस्य महेश जगताप, अहिल्यादेवी सेवा संघाचे अध्यक्ष अजय दूधभाते, भाजपा शहर आदिवासी मोर्चाचे अध्यक्ष ॲड. पांडुरंग कोरके, अनिता जाधव, रत्नमाला दूधभाते, महानगरपालिकेचे उपअभियंता सुनिलदत्त नरोटे, कनिष्ठ अभियंता स्वप्नील शिर्के, रंजना सुपे, हीरा विरनक, कल्पना बनसोडे, शांता साळुंखे, लक्ष्मी गोंदे, गिरीजा भोजने, अनुसया धादवड, सीमा साबळे, संगीता भांगरे, सीमा मोहिते, प्रदीप सामेरे, सुभाष मते, रमेश भागरे, भीमदेव गोंदे, तुकाराम शिंगाडे, प्रवीण मोहिते, सुनील भोजने, अण्णासाहेब वाघमोडे, अजय टिळेकर, पंढरीनाथ राणे यांच्यासह भीमाशंकर कॉलनी, विजयराज कॉलनी आणि गणेश नगर येथील नागरिक उपस्थित होते.



शंकर जगताप म्हणाले की, शहरातील दर्जेदार रस्ते, पायाभूत सुविधा निर्माण करण्यात पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने कायम सकारात्मक पुढाकार घेतला आहे. नव्याने समाविष्ट झालेल्या भागातील रस्ते सुसज्ज करण्यासाठी आता कालबद्ध कायक्रम आखणे अपेक्षीत आहे. प्रशासनाने स्थानिक नागरिकांच्या अपेक्षांची पूर्तता करताना पायाभूत सोयी-सुविधा सक्षम कराव्यात यासाठी आम्ही सर्वोतोपरी प्रयत्न करणार आहोत.

> ‘स्मार्ट सिटी’च्या दिशेने वाटचाल करणाऱ्या पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी महापालिका, राज्य सरकार आणि केंद्र सरकारच्या माध्यमातून विविध उपक्रम, प्रकल्प हाती घेतले जात आहेत. मुख्य रस्ते प्रशस्त होत आहेत. त्याच्या जोडीला शहरातील अंतर्गत रस्ते सुसज्ज असावेत. प्रत्येक प्रभागात रस्त्यांची कामे मार्गी लावावीत. यासाठी महापालिका प्रशासनाकडे पाठपुरावा करीत आहोत. पावसाळा सुरू होण्यापूर्वी ही कामे प्राधान्याने मार्गी लावावीत, अशा सूचना प्रशासनाला केल्या आहेत.
>
> **-शंकर जगताप, भाजपा, शहराध्यक्ष, पिंपरी- चिंचवड.**







# ही तर धोक्याची घंटा..!

**दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठ म्हणजेच जेएनयू आणि वाद हे समीकरण नवीन नाही. त्यात आता विद्यापीठ परिसरातील शैक्षणिक संकुलाच्या १०० मीटर परिसरात आंदोलन, घेराव, उपोषण, घोषणाबाजी या सगळ्यास बंदी घालण्याच्या प्रशासनाच्या नवीन आदेशाने विद्यार्थी संघटना आक्रमक झाल्या आहेत.**

या आदेशाचा भंग केल्यास २० हजार रुपये दंड किंवा विद्यार्थ्यांच्या हकालपट्टीच्या शिक्षेची तरतूद करण्यात आल्याने विद्यार्थ्यांमध्ये संतप्त प्रतिक्रिया आहे. जेएनयू हे विद्यार्थी चळवळीचे केंद्र मानले जाते. डाव्या चळवळीचा प्रभाव असलेल्या या विद्यापीठातून पुढे आलेल्या अनेकांनी देशाच्या राजकारणावर ठसा उमटवला आहे. सध्याच्या केंद्रीय मंत्रिमंडळातील निर्मला सीतारामन आणि ए. जयशंकर हे मंत्री, माकपचे आजी-माजी सरचिटणीस सीताराम येचूरी आणि प्रकाश करात, जी-२० परिषद यशस्वी करण्यात महत्त्वाची भूमिका बजाविणारे भारताचे शेर्पा आणि माजी सनदी अधिकारी अमिताभ कांत, आक्रमक विद्यार्थी नेता अशी ओळख असलेले कन्हैया कुमार असे राजकारण, समाजकारण, सनदी सेवा अशा क्षेत्रांमध्ये या विद्यापीठातील विद्यार्थी चमकले आहेत. जेएनयूचा उल्लेख राजकीय पिढी तयार करणारी शाळा असा केला जात असे. १९७५ मध्ये आणीबाणीच्या विरोधात येथील



विद्यार्थ्यांनी लढा दिला होता. सीताराम येचूरी, राष्ट्रवादीचे माजी खासदार डी. पी. त्रिपाठी यांनी तेव्हा आंदोलनाचे नेतृत्व केले होते.

आंदोलन, घेराव, वादविवाद हे या विद्यापीठाचे आजतागायत वैशिष्ट्य राहिले आहे. केंद्रात सत्ताबदल झाल्यापासून जेएनयूमधील डाव्यांचे प्रस्थ मोडून काढण्यावर भर देण्यात आला आहे. हैदराबादमधील रोहित वेमुला या दलित विद्यार्थ्यांच्या आत्महत्येचे पडसाद अन्य विद्यापीठांप्रमाणेच जेएनयूमध्येही उमटले होते. विद्यापीठातील काही विद्यार्थ्यांकडून 'भारत तेरे तुकडे होंगे' अशी घोषणाबाजी करण्यात आल्याची वादग्रस्त चित्रफीत अभाविपने माध्यमांसमोर आणली होती. तिच्या सत्यतेबाबत शेवटपर्यंत खुलासा होऊ शकला नाही. विद्यापीठातील आपला खुंटा अधिक बळकट करण्यासाठी केंद्र सरकारने विद्यापीठाच्या कुलगुरुपदी आधी जगदीश कुमार आणि नंतर शांतिश्री धुलीपुडी पंडित यांची नियुक्ती केली. जगदीश कुमार यांच्या कार्यकाळात विद्यापीठात अभाविपचे प्रस्थ वाढले. त्याचीच बक्षिसी म्हणून कुमार यांची विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अध्यक्षपदी वर्णी लागली असावी. आता विद्यापीठ अनुदान आयोगाकडून विविध वादग्रस्त निर्णय घेतले जात आहेत. कुलगुरुपदी आलेल्या पंडित यांनी तर वादांची जणू काही मालिकाच सुरू केली. पुण्याच्या सावित्रीबाई फुले विद्यापीठात प्राध्यापक असताना त्यांच्याविरोधात गैरव्यवहारांचे आरोप झाले होते. आता त्यांच्या कुलगुरुपदाच्या कार्यकाळात विद्यार्थ्यांवर बंधने घालण्यात आली आहेत.

शैक्षणिक संकुलात आंदोलन, घेराव, घोषणाबाजी नसावी हा मुद्दा योग्य आहे, पण ही सगळी लोकशाहीची, अभिव्यक्तीची आयुधे आहेत. त्यांचा वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांकडून २० हजार रुपये दंड आकारणे चुकीचे आहे. विद्यापीठात शिस्त राखणे आणि देशविरोधी शक्तींना थारा मिळू न देणे या उद्देशाने हा आदेश लागू करण्यात आल्याचा विद्यापीठ प्रशासनाचा युक्तिवाद असला तरी मग विद्यार्थ्यांनी एखाद्या गोष्टीला असलेला आपला विरोधा या ना त्या मार्गाने मांडायचाच नाही का असा प्रश्न उपस्थित होतो. विद्यार्थी चळवळीतून येऊन देशाच्या राजकारणात महत्त्वाची भूमिका बजाविणाऱ्या नेतेमंडळींची मोठी यादी आहे. त्यांना राजकारणाचे बाळकडू विद्यार्थिदशेतच मिळाले आणि त्यातूनच या नेतेमंडळींची कारकीर्द घडत गेली. आता मात्र देशाला नेते देणारी विद्यार्थी चळवळच मोडीत काढण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. अभाविप वगळता अन्य विद्यार्थी संघटनांची ताकद आकसली आहे. महाराष्ट्रात तर १९९०च्या दशकात ओवेन डिसोझा या विद्यार्थी नेत्याच्या हत्येनंतर विद्यापीठांमधील निवडणुकाच बंद झाल्या. त्यामुळे राज्यातील विद्यार्थी संघटनांसमोर अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला. या घटनेला तीन दशके उलटली तरी निवडणुका पुन्हा सुरू होऊ शकल्या नाहीत. निवडणुका स्थगित झाल्याने महाविद्यालयांमधील कटुता कमी झाली ही वस्तुस्थिती असली तरी राजकारणात येणारा विद्यार्थी नेत्यांचा ओघ मात्र आटला आहे.

## संपादकीय »

### गॅरंटी'चे रखवाले!

***नवे चेहरे देणे नेहमीच प्रस्थापितांस सोयीचे. नव्या चेहऱ्यांस संधी दिली म्हणून मिरवताही येते आणि हे नवे उपकृततेच्या भावनेने बराच काळ प्रस्थापितांच्या कह्यात असतात..***

भाजपने मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि राजस्थान या राज्यांत मुख्यमंत्री पदांवर निवडलेल्या व्यक्तींवर भाष्य करताना अनेकांनी त्याचे वर्णन 'पिढीबदल') असे केले. हा एक मुद्दा असू शकतो. पण त्यातून या बदलाचा अर्थ पूर्णपणे समजू शकत नाही. मध्य प्रदेशात मोहन यादव, राजस्थानात भजनलाल शर्मा आणि छत्तीसगडात विष्णुदेव साय या पूर्ण नव्या व्यक्तींस भाजपने मुख्यमंत्रीपदी बसवले. म्हणजे या राज्यांतील अनुक्रमे शिवराज सिंह चौहान, वसुंधराराजे शिंदे आणि डॉ. रमण सिंह यांची सद्दी भाजपने संपुष्टात आणली. तसे करताना हे सर्व नेते वयोवृद्ध होते आणि त्यांची जागा घेणारे तरणेबांड बहाद्दर आहेत असे अजिबात नाही. त्यामुळे नव्या, तरुण रक्तासाठी हा बदल भाजपने केला हे म्हणणे अयोग्य. उदाहरणार्थ मध्य प्रदेशाची सूत्रे ज्यांच्या हाती दिली गेली ते मोहन यादव ५८ वर्षांचे आहेत.

**पीएच.डी करून काय दिवे लावणार?' असे विधान महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले. यावरून संशोधनाबद्दल सरकार किती गंभीर आहे हे कळते. शालेय शिक्षणमंत्री म्हणतात प्राध्यापकांच्या जागा किती आहेत, त्याकरिता किती प्रमाणात विद्यार्थी पीएचडी करतात, या दृष्टीने ते विचार करतात.**

# पीएच. डी करून 'दिवे लांवायला' तेल आहे कुठे?

सरकारमधील दोन्ही मंत्र्यांचे मत हे त्यांची संशोधनाबद्दलची समज दर्शविते. संपूर्ण जगभर संशोधनाला प्राधान्य दिले जाते कारण संशोधन ही बौद्धिक संपदा निर्माण करण्याची प्रक्रिया आहे. त्यामुळे जगभरातील सरकारे संशोधनात मोठी गुंतवणूक करतात. त्यामुळे त्यांची विश्वविद्यालये संशोधनाच्या दृष्टीने अद्ययावत व सक्षम आहेत. जागतिक क्रमवारीमध्ये ती विश्वविद्यालय अव्वल दर्जाची आहेत. त्या तुलनेत राज्यातील विद्यापीठांमधील संशोधन व्यवस्था सुमार दर्जाची आहे कारण केंद्र तसेच राज्य सरकारकडून त्यांना पुरेसे अनुदान व मनुष्यबळ मिळत नाही. जागतिकीकरणाच्या काळात अनेक देशांनी भारतीय विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण व संशोधनासाठी आपल्याकडे आकर्षित केले. याचे महत्त्वाचे कारण आहे त्यांची संशोधनामधील गुंतवणूक. युनेस्कोच्या सांख्यिकी संस्थेच्या २०२० च्या अहवालानुसार जीडीपीच्या तुलनेत संशोधनावर गुंतवणूक करणाऱ्या देशांमध्ये इस्रायल (५.३५%), दक्षिण



कोरिया (४.८० %), स्वीडन (३.४९ %), बेल्जियम (३.४६%) व अमेरिका (३.४२%) हे देश अव्वल स्थानी आहेत. ब्रिक्स देशांमध्ये चीन (२.४%) रशिया (१.१%) ब्राझील (१.१%) हे देश अव्वल आहेत. युनेस्कोच्या अहवालानुसार संशोधनामधील जागतिक गुंतवणूक १.७ ट्रिलियन डॉलर्स एवढी असून जगातील प्रमुख दहा देशांची संशोधनावरील गुंतवणूक जगाच्या गुंतवणुकीच्या ८०% आहे. यावरून विकसित देश संशोधनाला किती प्राधान्य देतात, हे लक्षात येते. भारताची जीडीपीच्या तुलनेत संशोधनावरील गुंतवणूक फक्त ०.६२ % एवढी आहे. परंतु जागतिक स्तरावर भारतातील संशोधन प्रकाशन हे गेल्या १५ वर्षांमध्ये २.५ पट वाढले आहे. विज्ञान व तंत्रज्ञानामध्ये चीननंतर भारताचा क्रमांक लागतो. भारतातील संशोधनातील मनुष्यबळ किती उच्च दर्जाचे आहे हे यावरून लक्षात येते. परंतु सरकारची संशोधनासंदर्भातील नकारात्मकता गुंतवणुकीच्या पातळीवर तसेच राज्य व केंद्र स्तरावर दिसून येते. कृषि संशोधनावरील नगण्य खर्च ही चिंतेची बाब असल्याचे मत भारतीय कृषि संशोधन व शिक्षण विभागाचे माजी सचिव डॉ. मंगल रॉय यांनी व्यक्त केले आहे. सुरू केली आहे. ते फक्त स्वतःच्याच देशातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देत नाहीत, तर इतर देशांतील विद्यार्थ्यांनाही शिष्यवृत्ती देतात. महाराष्ट्रात ग्रामीण भागातून आलेले अनेकजण अशा शिष्यवृत्तीचा लाभ घेऊन जागतिक क्रमवारीतील विद्यापीठांमध्ये संशोधन करत आहेत. नुकतेच एडिनबर्ग विद्यापीठाने अमरावती येथील विद्यार्थ्याला राज्यशास्त्रात पीएचडी करण्यासाठी संशोधन शिष्यवृत्ती दिली.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## मराठा आरक्षणाच्या क्युरेटिव्ह याचिकेवर

# आजच निर्णय होणार?

## सर्वोच्च न्यायालय निकाल देण्याची 'ही' कारणं

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठा दाखल करण्यात आलेल्या क्युरेटिव्ह याचिकेवर शुक्रवार 15 डिसेंबर रोजी निर्णय देण्याची दाट शक्यता निर्माण झालीये. सर्वोच्च न्यायालयात ही क्युरेटिव्ह याचिका दाखल करण्यात आलीये. 15 डिसेंबर रोजी नाताळच्या सुट्ट्यांपूर्वी न्यायालयाच्या कामकाजाचा शेवटचा दिवस आहे. क्युरेटिव्ह याचिकेवर सुनावणी घेणाऱ्यांपैकी न्यायमूर्ती संजय किशन कौल यांचा निवृत्तीपूर्वी कामकाजाचा शेवटचा दिवस आहे.**

त्यामुळे ज्या न्यापीठासमोर क्युरेटिव्ह याचिकेवर सुनावणी झाली, त्या न्यायपिठातील न्यायाधीश संजय किशन कौल 25 डिसेंबर रोजी निवृत्त होणार आहेत. तसेच न्यायपिठातील न्यायाधीश निवृत्त होण्याआधी निकाल देण्याची सर्वसाधरण परंपरा आहे. त्यामुळे उद्याच मराठा आरक्षणावरील क्युरेटिव्ह याचिकेवर निकाल येण्याची शक्यता आहे. मराठा आरक्षण वैध की अवैध यावर सर्वोच्च न्यायालयात क्युरेटिव्ह याचिका दाखल करण्यात आली आहे. जयश्री पाटील यांनी ही याचिका दाखल केलीये. राज्य सरकारने मराठा समाजाला स्वतंत्र संवर्ग करून आरक्षणाची 50 टक्क्यांची मर्यादा ओलांडून दिलेले आरक्षण वैध आहे की नाही, या मुद्द्यावर पुन्हा आढावा घेतला जाणार आहे. मराठा आरक्षणच्या क्युरेटिव्ह याचिकेवर तीन प्रकारे निकाल लागण्याची शक्यता आहे. पहिली शक्यता ही क्युरेटिव्ह याचिका फेटाळली जाऊ शकते. असे झाल्यास मराठा आरक्षणाची शक्यता कोर्टातून मिळण्याची



शक्यता मावळणार असून संसदेवर अवलंबून राहवे लागणार आहे. क्युरेटिव्ह याचिकेमध्ये सुप्रीम कोर्ट नोटीस काढू शकते.याचा अर्थ प्रकरणातील प्रतिवादी जयश्री पाटील यांना मराठा आरक्षणाबाबत अशी याचिका दाखल आहे, त्यामुळे तुम्ही यावर भूमिका मांडा असे निर्देश सुप्रीम कोर्ट देऊ शकते. या प्रकरणातील तिसरी शक्यता म्हणजे ओपन कोर्टात सुनावणी करू असं म्हणत कोर्ट सुनावणीची तारीख देऊ शकते.

सुप्रीम कोर्टने क्युरेटिव्ह याचिका फेटाळल्यास राज्य सरकारची अडचण वाढू शकते. मागासवर्गीय आयोगाचा सुधारित अहवाल सादर करावा लागू शकतो. मराठा आरक्षणासाठी पुन्हा नव्याने सुरुवात करावी लागू शकते. तर, दुसरीकडे मराठा आरक्षण आंदोलक आक्रमक होण्याची शक्यता आहे. दरम्यान सुप्रीम कोर्टाच्या निकालाने मराठा आरक्षणाच्या सुनावणीसाठी नोटीस काढली किंवा ओपन कोर्टात सुनावणी करण्याचा निर्णय झाला तर सरकारसाठीही आनंदाची बातमी असेल.मराठा दाखल करण्यात आलेल्या क्युरेटिव्ह याचिकेवर (curative petition) शुक्रवार 15 डिसेंबर रोजी निर्णय देण्याची दाट शक्यता निर्माण झालीये.

सर्वोच्च न्यायालयात (Supreme Court) ही क्युरेटिव्ह याचिका दाखल करण्यात आलीये. कारण उद्या म्हणजेच 15 डिसेंबर रोजी नाताळच्या सुट्ट्यांपूर्वी न्यायालयाच्या कामकाजाचा शेवटचा दिवस आहे. क्युरेटिव्ह याचिकेवर सुनावणी घेणाऱ्यांपैकी न्यायमूर्ती संजय किशन कौल यांचा निवृत्तीपूर्वी कामकाजाचा शेवटचा दिवस आहे.

### संसदेवर अवलंबून राहवे लागणार

» न्यापीठासमोर क्युरेटिव्ह याचिकेवर सुनावणी झाली, त्या न्यायपिठातील न्यायाधीश संजय किशन कौल 25 डिसेंबर रोजी निवृत्त होणार आहेत. तसेच न्यायपिठातील न्यायाधीश निवृत्त होण्याआधी निकाल देण्याची सर्वसाधरण परंपरा आहे. त्यामुळे उद्याच मराठा आरक्षणावरील क्युरेटिव्ह याचिकेवर निकाल येण्याची शक्यता आहे. मराठा आरक्षण वैध की अवैध यावर सर्वोच्च न्यायालयात क्युरेटिव्ह याचिका दाखल करण्यात आली आहे. जयश्री पाटील यांनी ही याचिका दाखल केलीये. राज्य सरकारने मराठा समाजाला स्वतंत्र संवर्ग करून आरक्षणाची 50 टक्क्यांची मर्यादा ओलांडून दिलेले आरक्षण वैध आहे की नाही, या मुद्द्यावर पुन्हा आढावा घेतला जाणार आहे. मराठा आरक्षणच्या क्युरेटिव्ह याचिकेवर तीन प्रकारे निकाल लागण्याची शक्यता आहे. पहिली शक्यता ही क्युरेटिव्ह याचिका फेटाळली जाऊ शकते. असे झाल्यास मराठा आरक्षणाची शक्यता कोर्टातून मिळण्याची शक्यता मावळणार असून संसदेवर अवलंबून राहवे लागणार आहे. क्युरेटिव्ह याचिकेमध्ये सुप्रीम कोर्ट नोटीस काढू शकते.याचा अर्थ प्रकरणातील प्रतिवादी जयश्री पाटील यांना मराठा आरक्षणाबाबत अशी याचिका दाखल आहे, त्यामुळे तुम्ही यावर भूमिका मांडा असे निर्देश सुप्रीम कोर्ट देऊ शकते. या प्रकरणातील तिसरी शक्यता म्हणजे ओपन कोर्टात सुनावणी करू असं म्हणत कोर्ट सुनावणीची तारीख देऊ शकते.

---

# लोकसभा निवडणुकांसाठी भाजपचा मेगाप्लॅन!

## आचारसंहिता लागणार, आमदारांना कामाला लागण्याच्या सूचना

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**लोकसभा निवडणुकांसाठी भाजपने (BJP) मेगाप्लान तयार केला असल्याची माहिती समोर आलीये. भाजपचा हाच मेगाप्लान एबीपी माझाच्या हाती लागलाय. 55 दिवसांत आचारसंहिता लागणार असून सर्व आमदारांना कामाला लागण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.**

उमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस (Devendra Fadanvis) यांचे शासकीय निवासस्थान असलेल्या देवगिरी बंगल्यावर भाजपच्या सर्व आमदारांची बैठक पार पडली. या बैठकीमध्ये सर्व आमदारांना कामाला लागण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. लोकसभा निवडणुकांच्या आचारसंहितेला फार दिवस राहिले नसून 55 दिवसांत आचारसंहिता लागेल, त्यामुळे कामाला लागा अशा सूचना या बैठकीत देण्यात आल्या आहेत. त्याच पार्श्वभूमीवर भाजपकडून सर्व आमदारांना नमो टार्गेट देण्यात आलं



आहे. आज देवगिरीवर झालेल्या बैठकीत तसेच यापूर्वी मुंबईत झालेल्या राष्ट्रीय अध्यक्षांच्या बैठकीत अनुपस्थित आमदारांच्या संख्येबाबत कानउघडणी देखील करण्यात आलीये. याच बैठकीच्या माध्यमातून भाजप श्रेष्ठींनी आमदारांचा क्लास घेतला असल्याचं सांगण्यात येत आहे. 25 जानेवारीपर्यंत राज्यात 50 लाख नमो ॲप डाऊनलोड करुन घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. प्रत्येक आमदारांनं मतदारसंघात किमान 30 हजार ॲप डाऊनलोड करुन घ्यावेत. आमदारांनी रोज सकाळी किमान 5 मिनिटं नमो ॲपवर घालवावीत. मतदारसंघात 150 बूथ प्रमुख तयार करावेत, बूथप्रमाणे सुपर वॉरियर देखील नेमावेत. लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहितेला आता जास्त दिवस नाहीत. फेब्रुवारी महिन्यात देवेंद्र फडणवीसांची लोकसभा निवडणुकांसाठीची विशेष यात्रा देखील निघणार आहे. ही यात्रा प्रत्येक लोकसभा मतदारसंघातून जाईल, असा मेगाप्लान भाजपकडून तयार करण्यात आलाय. येत्या फेब्रुवारी महिन्याच्या शेवटी किंवा मार्च महिन्याच्या शेवटी लोकसभा निवडणुका लागण्याची शक्यता आहे, कारण मागील निवडणुका देखील याच दरम्यान लागल्या होत्या. त्यामुळे आता मोजून 50 ते 60 दिवसंच शिल्लक आहेत आचारसंहिता लागण्यासाठी. त्यामुळे निवडणूक आयोग यासंदर्भात काय दिशा घेणार हे माहित नाही.

# नजर चुकीने झाली निलंबनाची घोषणा

## लक्षात आल्यानंतर यादीतून नाव वगळलं

**। नवी दिल्ली ।**

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**





**संसद सुरक्षेच्या मुद्द्यावरून सभागृहात गोंधळ (PARLIAMENT SECURITY BREACH) केल्याप्रकरणी लोकसभेतील 14 खासदारांचे निलंबन केल्याची घोषणा दुपारी करण्यात आली होती. त्यापैकी एका खासदाराचे निलंबन मागे घेण्यात आले आहे. एकूण निलंबित खासदारांची संख्या आता 13 आहे. डीएमडीके (DMK) पक्षाचे खासदार एस. आर. पार्थिबन (S. R. PARTHIBAN) यांचे निलंबन नजरचुकीने झाल्याचे लक्षात आल्याने लोकसभा सचिवालयाकडून निलंबित खासदारांच्या यादीतून त्यांचे नाव वगळण्यात आले आहे. एस. आर. पार्थिबन हे लोकसभेच्या गोंधळावेळी सदनात उपस्थित नसल्याचं स्पष्ट झालं आहे.**

संसदेच्या सुरक्षेच्या मुद्द्यावरून विरोधी पक्षांनी आज संसदेत गोंधळ घातला. त्यानंतर सुरुवातीला लोकसभेच्या 13 आणि राज्यसभेचा एक अशा 14 खासदारांचे निलंबन केल्याची घोषणा करण्यात आली. मात्र आता निलंबित खासदारांच्या यादीतून सरकारने द्रमुकचे खासदार एसआर पार्थिबन यांचे लोकसभेतील निलंबन मागे घेतले आहे. कारण त्यांचे नाव निलंबनाच्या यादीत चुकून आले होते. चूक समजल्यानंतर त्यांचे नाव तात्काळ मागे घेण्यात आले.

संसदीय कामकाज मंत्री प्रल्हाद जोशी म्हणाले की, सदस्याची ओळख पटवण्यात कर्मचाऱ्यांकडून चूक झाल्याने पार्थिबन यांचे नाव निलंबित लोकसभा सदस्यांच्या यादीतून काढून घेण्यात आले आहे. चुकीच्या ओळखीचे प्रकरण असल्याने सदस्याचे नाव वगळण्याची विनंती मी सभापतींना केली आहे. अध्यक्षांनीही ही सूचना मान्य केली आहे. संसदीय कामकाज मंत्री प्रल्हाद जोशी म्हणाले की, सभागृहाचे कामकाज नवीन संसदेच्या इमारतीत हलविण्यात आले तेव्हा सभापतींनी कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत सदस्यांना फलक न लावण्याचा नवीन ठराव घेऊन काम करावे लागेल असा प्रस्ताव मांडला होता. त्यावेळी कोणीही विरोध केला नव्हता. आता 13 खासदारांनी कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयाचे उल्लंघन केले आहे. त्यांनी सभागृहात फलक आणले, त्यामुळे त्यांना हिवाळी अधिवेशनाच्या उर्वरित कामकाजासाठी निलंबित करण्यात आले आहे.सद सुरक्षेच्या मुद्द्यावरून सभागृहात गोंधळ (PARLIAMENT SECURITY BREACH) केल्याप्रकरणी लोकसभेतील 14 खासदारांचे निलंबन केल्याची घोषणा दुपारी करण्यात आली होती. त्यापैकी एका खासदाराचे निलंबन मागे घेण्यात आले आहे. एकूण निलंबित खासदारांची संख्या आता 13 आहे. डीएमडीके (DMK) पक्षाचे खासदार एस. आर. पार्थिबन (S. R. PARTHIBAN) यांचे निलंबन नजरचुकीने झाल्याचे लक्षात आल्याने लोकसभा सचिवालयाकडून निलंबित खासदारांच्या यादीतून त्यांचे नाव वगळण्यात आले आहे. एस. आर. पार्थिबन हे लोकसभेच्या गोंधळावेळी सदनात उपस्थित नसल्याचं स्पष्ट झालं आहे. संसदेच्या सुरक्षेच्या मुद्द्यावरून विरोधी पक्षांनी आज संसदेत गोंधळ घातला. त्यानंतर सुरुवातीला लोकसभेच्या 13 आणि राज्यसभेचा एक अशा 14 खासदारांचे निलंबन केल्याची घोषणा करण्यात आली. मात्र आता निलंबित खासदारांच्या यादीतून सरकारने द्रमुकचे खासदार एसआर पार्थिबन यांचे लोकसभेतील निलंबन मागे घेतले आहे. कारण त्यांचे नाव निलंबनाच्या यादीत चुकून आले होते. चूक समजल्यानंतर त्यांचे नाव तात्काळ मागे घेण्यात आले. संसद सुरक्षेच्या मुद्द्यावरून सभागृहात गोंधळ (PARLIAMENT SECURITY BREACH) केल्याप्रकरणी लोकसभेतील 14 खासदारांचे निलंबन केल्याची घोषणा दुपारी करण्यात आली होती.

### लोकसभेतील निलंबन मागे घेतले

मात्र आता निलंबित खासदारांच्या यादीतून सरकारने द्रमुकचे खासदार एसआर पार्थिबन यांचे लोकसभेतील निलंबन मागे घेतले आहे. कारण त्यांचे नाव निलंबनाच्या यादीत चुकून आले होते. चूक समजल्यानंतर त्यांचे नाव तात्काळ मागे घेण्यात आले. संसदीय कामकाज मंत्री प्रल्हाद जोशी म्हणाले की, सदस्याची ओळख पटवण्यात कर्मचाऱ्यांकडून चूक झाल्याने पार्थिबन यांचे नाव निलंबित लोकसभा चुकीच्या ओळखीचे प्रकरण असल्याने सदस्याचे नाव वगळण्याची विनंती मी सभापतींना केली आहे.

# घुसखोरी करणाऱ्या सात दिवसांची कोठडी

## यूएपीए अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला

**। नवी दिल्ली ।**

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**



**घुसखोरी करणाऱ्या चौघांवर यूएपीए अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. आता या चार जणांना चौकशीसाठी सात दिवसांची पोलिस कोठडी (POLICE CUSTODY) सुनावण्यात आली आहे. लोकसभेत पकडले गेलेले सागर शर्मा आणि डी मनोरंजन आणि संसदेबाहेर अटक करण्यात आलेले नीलम देवी आणि अमोल शिंदे यांची सविस्तर चौकशी करावी लागेल, अशी माहिती दिल्ली पोलिसांनी दिली.**

लोकसभेचं कामकाज सुरू असताना अचानक दोन जण प्रेक्षक गॅलरीतून सभागृहात आले. मग दोघेही खासदारांच्या बाकांवरून उड्या मारत धावू लागले. संसदेत विषारी धूर सोडला. लोकसभेत घुसखोरी करणाऱ्या तरुणाला खासदार कोटकांनी पकडलं. या घटनेमुळे संसदेच्या सुरक्षा यंत्रणेवर मात्र प्रश्न उपस्थित झाले. धक्कादायक बाब म्हणजे खासदाराच्या प्रताप सिम्हा यांच्या पासवर हे दोन्ही तरुण सभागृहात शिरले. खासदारार प्रताप सिम्हा हे भाजपचे नेते आहेत. त्यांच्याच शिफारसीवर आरोपीचा पास तयार करण्यात आला होता त्यामुळे या अनुशंगानेही चौकशी केली जाण्याची शक्यता आहे. संसद भवनातील घुसखोरी प्रकरणाची चौकशी करण्याचे (PARLIAMENT SECURITY BREACH) आदेश केंद्रीय गृह खात्यानं (MHA ) दिले आहेत. सीआरपीएफचे महासंचालक अनिश दयाल सिंग (ANISH DAYAL SINGH) यांच्या नेतृत्वात ही चौकशी केली जाईल. अन्य सुरक्षा यंत्रणांचे प्रमुख देखील या चौकशी समितीत असतील. ही समिती घटनेची कारणं शोधून काढेल, तसंच यापुढे काय खबरदारी घेतली पाहिजे याबाबत देखील शिफारसी करेल. केंद्रीय गृह खात्यानं अनिश दयाल सिंग यांच्या अध्यक्षतेखाली एक चौकशी समिती स्थापन केली आहे. ज्यामध्ये इतर सुरक्षा संस्था आणि तज्ञ सदस्य आहेत. चौकशी समिती संसदेच्या सुरक्षेच्या भंगाच्या कारणांची चौकशी करेल, त्रुटी ओळखून पुढील कारवाईची शिफारस करेल.

# अदानी समूह करणार 8700 कोटींची गुंतवणूक

**। नवी दिल्ली ।**

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

बिहारमध्ये (BIHAR) विविध क्षेत्रात मोठी गुंतवणूक करण्याच्या तयारीत आहे. हा समूह सिमेंट उत्पादन, लॉजिस्टिक आणि कृषी-उद्योगात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करणार आहे. अदानी समूह येत्या काही दिवसांत बिहारमध्ये 8700 कोटी रुपयांची गुंतवणूक करणार असल्याची माहिती अदानी एंटरप्रायझेसचे संचालक प्रणव अदानी (PRANAV ADANI) यांनी दिली. बिहारमध्ये सुरु असलेल्या दोन दिवसीय ग्लोबल इन्व्हेस्टर्स समिटच्या दुसऱ्या दिवशी बिहार बिझनेस कनेक्ट - 2023 ला संबोधित प्रणव अदानी बोलत होते. शिखर परिषदेला संबोधित करताना प्रणव अदानी म्हणाले की, अदानी समूहाने बिहारमध्ये 850 कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे. आता समूहाने सिमेंट उत्पादन, लॉजिस्टिक आणि कृषी-उद्योग यासारख्या अतिरिक्त क्षेत्रांमध्ये 8700 कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला आहे. ज्यामुळं राज्यातील सुमारे 10,000 लोकांना प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध होणार आहे. दरम्यान, अदानी ग्रुपने बिहारमध्ये आधीच 850 कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे. आता गुंतवणूक 10 पट वाढवण्याची तयारी केली आहे. प्रणव अदानी म्हणाले की, बिहार हे देशातील अतिशय आकर्षक गुंतवणुकीचे ठिकाण म्हणून उदयास आले आहे.


# झिम्मा 2'चा नवा ट्रेलर आऊट




राठी मनोरंजनसृष्टी पुन्हा बहरली आहे. वेगवेगळ्या दर्जाची नाटके (DRAMA), मालिका (SERIAL) आणि चित्रपट (MOVIES) प्रेक्षकांच्या भेटीला येत आहेत. जगभरातील प्रेक्षकांना मराठी कलाकृती आवडत आहेत. पण कलाकाराचं वैयक्तिक आयुष्य कसं आहे, मालिका आणि सिने विश्वात काय घडामोडी घडत आहेत हे जाणून घेण्याची देखील प्रेक्षकांना उत्सुकता आहे. जाणून घ्या मराठी मनोरंजनसृष्टीसंबंधित बातम्या... भारतीय मोठ्या प्रमाणावर सोशल मीडिया (SOCIAL MEDIA) वापरतात. फेसबुक यांसारखे सोशल मीडिया प्लॅटफॉर्म (SOCIAL MEDIA PLATFORM) भारतात (INDIA) खूप लोकप्रिय आहेत आहे. अनेक जण काही सोशल मीडियाचा वापर संपर्कासाठी करतात तर काही जण व्हिडीओ आणि रील पाहण्यासाठी करतात. काहीजण स्वतःचे व्हिडीओ बनवून प्रसिद्ध होण्यासाठी सोशल मीडियाचा वापर करतात. असे अनेक लोक आहेत ज्यांना सोशल मीडियामुळे प्रसिद्धी मिळाली आहे. ज्यांना काही महिन्यांपूर्वी लोक ओळखतही नव्हते, ते लोक सोशल मीडियामुळे राजोरात स्टार झाले आणि संपूर्ण देश त्यांना ओळखू लागला आहे. आज आम्ही अशा सोशल मीडिया स्टार्सबद्दल सांगणार आहोत, ज्यांच्यासाठी 2023 हे वर्ष खूप खास होतं. यावर्षी या व्यक्तींना इंटरनेटवर मोठ्या प्रमाणावर प्रसिद्धी मिळाली आणि जे रातोरात देशातील घराघरांत पोहोचले. हा मराठी सिनेमा सध्या बॉक्स ऑफिस गाजवत आहे. या सिनेमाची गोष्ट, कलाकारांचा अभिनय, गाणी, दिग्दर्शन अशा सर्वच गोष्टी प्रेक्षकांच्या पसंतीस उतरल्या आहेत.

# डंकी प्रदर्शनाआधी शाहरुखने घेतले साई दर्शन!

हा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. त्यासाठी शाहरुख हा शिर्डीत (SHIRDI) साई दर्शन घेण्यासाठी दाखल झाला. यावेळी शिर्डीत शाहरुखला बघताच चाहत्यांनी एकच जल्लोष केला. तसेच शाहरुखने फ्लाईंग किस करत चाहत्यांना अभिवादन देखील केले. यावेळी शाहरुखसोबत त्याची मुलगी सुहाना देखील होती. शाहरुखचा डंकी हा चित्रपट प्रदर्शनासाठी सज्ज झालाय. पठाण' (PATHAAN) आणि 'जवान' (JAWAN) या बॅक टू बॅक सुपरहिट सिनेमानंतर 'डंकी' या सिनेमाच्या माध्यमातून किंग खान रुपेरी पडदा पुन्हा एकदा गाजवणार आहे. 'डंकी' या सिनेमाचा रिलीजआधीच जगभरात बोलबाला पाहायला मिळत आहे. दरम्यान याआधीच शाहरुखने वैष्णो देवीचे दर्शन घेतले. त्याचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल देखील झाला. या व्हिडीओमध्ये किंग खान आपली मॅनेजर पूजा ददलानीसोबत दिसत होता. शाहरुख खान या वर्षात तिसऱ्यांदा वैष्णो देवीच्या दर्शनाला गेला आहे. 'पठाण' आणि 'जवान'च्या रिलीजआधी शाहरुख खान वैष्णो देवीच्या दर्शनाला गेला होता. शाहरुख खान अभिनीत 'डंकी' या सिनेमाची चाहत्यांना उत्सुकता आहे. राजकुमार हिरानी यांनी या सिनेमाच्या दिग्दर्शनाची धुरा सांभाळली आहे. 'डंकी' हा सिनेमा 21 डिसेंबर 2023 रोजी सिनेमागृहात प्रदर्शित होणार आहे. या सिनेमात शाहरुखसह तापसी पन्नू, विकी कौशल, बोमन ईरानी आणि विक्रम कोचर मुख्य भूमिकेत दिसणार आहेत. 120 कोटींच्या बजेटमध्ये या सिनेमाची निर्मिती करण्यात आली आहे. 'डंकी' या सिनेमाची प्रभास आणि प्रशांत नीलच्या 'सालार' या सिनेमासोबत टक्कर होणार आहे. 'पठाण' आणि 'जवान'पेक्षा 'डंकी' या सिनेमाचे सर्वाधिक शो ठेवण्यात आले आहेत. जगभरात ॲडव्हान्स बुकिंगमध्ये या सिनेमाला चांगला प्रतिसाद मिळत आहे. आतापर्यंत या सिनेमाचे जगभरात 5500 तिकिटे विकले गेले असल्याची माहिती आहे. भारतात लवकरच या सिनेमाचं ॲडव्हान्स बुकिंग सुरू होईल. शाहरुखच्या 'डंकी' या सिनेमाच्या दिग्दर्शनाची धुरा राजकुमार हिरानीयांनी सांभाळली आहे.



# स्वत:ला कोंडून रडत बसते अनन्या पांडे

बॉलिवूडची लोकप्रिय अभिनेत्री आहे. नेहमीच ती कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असते. सध्या अभिनेत्री तिच्या आगामी 'खो गए हम कहाँ' (KHO GAYE HUM KAHAN) या सिनेमामुळे चर्चेत आहे. 'गहराइयां' (GEHRAIYAAN) या सिनेमानंतर अभिनेत्री पुन्हा एकदा सिद्धांत चतुर्वेदीसह (SIDDHANT CHATURVEDI) स्क्रीन शेअर करताना दिसणार आहे. अनन्या अनेकदा आदित्य रॉय कपूरसोबतच्या (ADITYA ROY KAPOOR) रिलेशनमध्ये चर्चेत असते.

'कॉफी विथ करण 8' या कार्यक्रमात अनन्या पांडेने नकळत आदित्य रॉय कपूरसोबतच्या रिलेशनबद्दलची हिंट दिली होती. तर दुसरीकडे आदित्यने करणला आधिच सांगितलं होतं की,"खोटं बोलावं लागेल असे काही प्रश्न विचारू नकोस". दरम्यान अनन्याचं एक वक्तव्य सध्या चांगलच चर्चेत आहे. अभिनेत्रीने ब्रेकअपमधून कशी बाहेर पडते याबद्दल भाष्य केलं आहे. अनन्या पांडेने नुकतीच आ ज तकच्या एका कार्यक्रमात हजेरी लावली होती. त्यावेळी ब्रेकअपमधून कशी बाहेर पडते? असा प्रश्न अनन्याला विचारण्यात आला. या प्रश्नाचं उत्तर देत अनन्या म्हणाली,"मी स्वत:ला खोलीत कोंडून घेऊन रडते आणि आयस्क्रीम खाते. एकांतात रडायला मला आवडतं". ब्रेकअपमधून कसं बाहेर पडायचं हे सांगत अनन्या म्हणाली,"ब्रेकअपमधून आरामात बाहेर पडायचं.. घाई करायची नाही..आणि आयस्क्रीन खायची".



# 'डंकी'चा जगभरात बोलबाला!

बॉलिवूडचा बादशाह शाहरुख खानचा (SHAH RUKH KHAN) 'डंकी' (DUNKI) हा सिनेमा रिलीजसाठी सज्ज आहे. 'पठाण' (PATHAAN) आणि 'जवान' (JAWAN) या बॅक टू बॅक सुपरहिट सिनेमानंतर 'डंकी' या सिनेमाच्या माध्यमातून किंग खान रुपेरी पडदा पुन्हा एकदा गाजवणार आहे. 'डंकी' या सिनेमाचा रिलीजआधीच जगभरात बोलबाला पाहायला मिळत आहे. शाहरुखच्या 'डंकी' या सिनेमाच्या दिग्दर्शनाची धुरा राजकुमार हिरानी (RAJKUMAR HIRANI) यांनी सांभाळली आहे. राजकुमार हिरानी यांच्यासोबत शाहरुखने पहिल्यांदाच एकत्र काम केलं आहे. हिरानी यांचे 'मुन्नाभाई एमबीबीएस', '3 इडियट्स' आणि 'पीके' असे अनेक सिनेमे सुपरहिट ठरले आहेत. त्यामुळे आता 'डंकी' या सिनेमाकडून सिनेप्रेक्षकांच्या खूप अपेक्षा आहेत.

# सरत्या वर्षात 'या' मराठी कलाकारांचं पूर्ण झालं घराचं स्वप्न

त:चं घर होणं हे सर्वसामान्यांपासून ते मराठी कलाकारांपर्यंत अनेकांचं स्वप्न असतं. सरत्या वर्षात अनेक मराठी सेलिब्रिटींचं घराचं स्वप्न पूर्ण झालं आहे. सई ताम्हणकरपासून (SAI TAMHANKAR), प्राजक्ता माळी (PRAJAKTA MALI) ते पृथ्वीक प्रतापपर्यंत (PRITHVIK PRATAP) अनेक सेलिब्रिटींचं घराचं स्वप्न पूर्ण झालं आहे. प्राजक्ता माळी (PRAJAKTA MALI) : अभिनेत्री



प्राजक्ता माळीने कर्जमध्ये स्वत:चं फार्म हाऊस घेतलं आहे. प्राजक्ताचं हे फार्म हाऊस निसर्गाच्या कुशीत आहे. 3 बेडरूम्स, हॉल, किचन , स्विमिंगपूल असं तिचं आलिशान फार्महाऊस आहे.

सई ताम्हणकर : सई ताम्हणकर 2023 मध्ये मुंबईकर झाली आहे. मुंबईत तिने स्वत:चं पहिलं घर घेतलं आहे. मुंबईत घर घेतल्यानंतर तिने गृहप्रवेश करतानाचा व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केला आहे. सईसाठी हे घर खूपच खास आहे.

# सतीश-रॉड्रिग्जची शानदार खेळी!

## पहिल्या दिवसअखेर टीम इंडिया मजबूत स्थितीत

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**तब्बल दोन वर्षांनंतर कसोटी सामना खेळायला आलेल्या महिलांनी इंग्लंडविरुद्धच्या एकमेव कसोटीच्या पहिल्याच दिवशी भरघोस धावा केल्या. चार अर्धशतके आणि दोन शतकी भागीदारींच्या जोरावर भारतीय संघाने पहिल्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा सात गड्यांच्या मोबदल्यात ४१० धावा केल्या होत्या. महिलांच्या कसोटी इतिहासात एकाच संघाने एका दिवसात केलेली ही दुसरी सर्वोच्च धावसंख्या आहे. एका दिवसातील सर्वोच्च धावसंख्या ८८ वर्षांपूर्वी इंग्लंडने न्यूझीलंडविरुद्ध ४ गडी गमावून ४३१ धावा केल्या होत्या. इतकेच नाही तर भारतीय भूमीवर बनवलेल्या कोणत्याही संघाची ही दुसरी सर्वोच्च धावसंख्या आहे.**



यापूर्वी १९८४ मध्ये अहमदाबादमध्ये ऑस्ट्रेलियाने भारताविरुद्ध ५२५ धावा केल्या होत्या. सतीश शुभा आणि जेमिमाह रॉड्रिग्स यांनी महिला कसोटीत पदार्पण केले आणि दोघांनी अर्धशतके केली. हरमनप्रीत कौरने नाणेफेक जिंकून डी.वाय. पाटील स्टेडियममध्ये इंग्लंडविरुद्ध फलंदाजीचा निर्णय घेतला. स्मृती मानधना (१७) आणि शफाली वर्मा (१९) यांच्या विकेट्स ४७ धावांत गेल्या. इथून शुभा आणि जेमिमाह यांनी १४२ चेंडूत ११५ धावांची भागीदारी केली. शुभाने आपले अर्धशतकही ४९ चेंडूत पूर्ण केले. कोणत्याही भारतीय महिला कसोटी क्रिकेटपटूचे हे दुसरे सर्वात जलद अर्धशतक आहे. ४० चेंडूत अर्धशतक झळकावण्याचा विक्रम भारताच्या संगीता डबीरच्या नावावर आहे. शुभाने ७६ चेंडूत १३ चौकारांच्या मदतीने ६९ धावा केल्या. यानंतर जेमिमाह ९९ चेंडूत ११ चौकारांच्या मदतीने ६८ धावा करून बेलच्या गोलंदाजीवर ती त्रिफळाचीत झाली. १९० धावांवर ४ विकेट्स पडल्यानंतर कर्णधार हरमनप्रीत कौर आणि यास्तिका भाटिया यांनी ११६ धावांची शानदार भागीदारी केली. हरमनप्रीत ४९ धावांवर खेळत होती, मात्र तिच्या निष्काळजीपणामुळे ती धावबाद झाली. जेव्हा व्याटचा थ्रो स्टंपला लागला तेव्हा तिची बॅट क्रीझमध्ये नव्हती आणि ती धावबाद झाली. यानंतर यस्तिका भाटियाही ८८ चेंडूत १० चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने ६६ धावा करून बाद झाली. तिचे हे महिला कसोटीतील पहिले अर्धशतक ठरले. भारताच्या सहा विकेट्स ३१३ धावांवर पडल्या होत्या. इंग्लंडचा डाव लवकरच गुंडाळणार असे वाटत होते, मात्र अष्टपैलू दीप्ती शर्माला स्नेह राणाची साथ लाभली. या जोडीने इंग्लंडच्या गोलंदाजांचा चांगलाच घाम काढला. दोघींनी सातव्या विकेटसाठी ९२ धावांची भागीदारी केली. खेळ संपण्याच्या काही वेळापूर्वी, नेट शिव्हर ब्रंटने स्नेहला ३० धावांवर बाद केले. तत्पूर्वी, दीप्तीने तिसऱ्या कसोटीत तिसरे अर्धशतक पूर्ण केले. दिवस संपेपर्यंत तिने ९५ चेंडूत ६० केल्या होत्या. ज्यामध्ये तिने नऊ चौकार आणि एक षटकार मारला होता. त्याच्यासोबत पूजा वस्त्राकरही नाबाद ४० धावांवर खेळली. इंग्लंडने दिवसभरात निर्धारित १०० षटकांपैकी ९४ षटके टाकली. भारत आणि इंग्लंड यांच्यात १९८६ पासून खेळल्या गेलेल्या १४ कसोटींपैकी भारताला फक्त एकच पराभव पत्करावा लागला आहे. दोन्ही संघांमधील हा १५वा कसोटी सामना आहे. प्रथमच कसोटीत भारताचे कर्णधारपद भूषवणाऱ्या हरमनप्रीतला हा विक्रम कायम राखायचा आहे. ही इंग्लंडची १००वी कसोटी आहे आणि भारताविरुद्धचा त्यांचा एकमेव विजय १९९५ मध्ये जमशेदपूर येथे झाला होता जेव्हा त्यांनी कसोटी दोन धावांनी जिंकली होती. भारतीय कर्णधार हरमनप्रीत कौरने नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला. तीन खेळाडू भारताकडून कसोटी पदार्पण करत आहेत. कर्नाटकची २४ वर्षीय फलंदाजी अष्टपैलू शुभा सतीश, जेमिमाह रॉड्रिग्स आणि रेणुका ठाकूर या टीम इंडियासाठी कसोटी पदार्पण करणाऱ्या तीन खेळाडू आहेत. त्याचबरोबर इंग्लंडकडून कोणीही पदार्पण करत नाही. पांढऱ्या चेंडूच्या क्रिकेटमध्ये इंग्लिश महिला संघाकडून सलामी देणाऱ्या सोफिया डंकलेवरही एम्मा लॅम्बच्या अनुपस्थितीत कसोटीत जबाबदारी सोपवण्यात आली आहे. भारतीय संघाला दहा दिवसांत दोन कसोटी खेळायच्या आहेत. इंग्लंडविरुद्धच्या सामन्यानंतर भारतीय संघ वानखेडे स्टेडियमवर २१ ते २४ डिसेंबर दरम्यान ऑस्ट्रेलियाशी खेळणार आहे. भारताने सप्टेंबर २०२१ मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध शेवटची कसोटी खेळली, जी अनिर्णित राहिली. त्या सामन्यात मंधानाने १२७ आणि ३१ धावा केल्या होत्या.

### स्नेहला 30 धावांवर बाद केले

भारताच्या सहा विकेट्स ३१३ धावांवर पडल्या होत्या. इंग्लंडचा डाव लवकरच गुंडाळणार असे वाटत होते, मात्र अष्टपैलू दीप्ती शर्माला स्नेह राणाची साथ लाभली. या जोडीने इंग्लंडच्या गोलंदाजांचा चांगलाच घाम काढला. दोघींनी सातव्या विकेटसाठी ९२ धावांची भागीदारी केली. खेळ संपण्याच्या काही वेळापूर्वी, नेट शिव्हर ब्रंटने स्नेहला ३० धावांवर बाद केले. तत्पूर्वी, दीप्तीने तिसऱ्या कसोटीत तिसरे अर्धशतक पूर्ण केले. दिवस संपेपर्यंत तिने ९५ चेंडूत ६० केल्या होत्या.

# पर्थ कसोटीत डेव्हिड वॉर्नरचे धडाकेबाज दीडशतक!

## मिचेल मार्श 15 आणि अॅलेक्स कॅरी 14 धावांवर खेळत आहेत

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**सामन्याचा पहिला दिवस ऑस्ट्रेलियाच्या नावावर राहिला. सलामीवीर डेव्हिड वॉर्नरने 164 धावांची धडाकेबाज खेळी केली. ज्यामुळे कांगारूंना दिवसाचा खेळ संपेपर्यंत पाच विकेटस्वर 346 धावांपर्यंत सहज मजल मारता आली. दिवसाचा खेळ संपला तेव्हा मिचेल मार्श 15 आणि अॅलेक्स कॅरी 14 धावांवर खेळत आहेत.**




पाकिस्तानची कमकुवत गोलंदाजी आणि विस्कळीत क्षेत्ररक्षण याचा फायदा घेत यजमान संघाने 4 हून अधिकच्या रनरेटने धावा वसूल केल्या. पाक गोलंदाज विकेट मिळवण्यासाठी अक्षरशः हतबल दिसले. पर्थ कसोटीच्या पहिल्याच डावात ऑस्ट्रेलियाने आक्रमक फलंदाजी केली. सामन्याच्या पहिल्याच षटकात 14 धावा करून ऑस्ट्रेलियाने आपले इरादे स्पष्ट केले होते. वॉर्नरने सलामीवीर उस्मान ख्वाजासोबत पहिल्या विकेटसाठी 126 धावांची भागीदारी केली. ख्वाजाला (41 धावा) शाहीन आफ्रिदीने बाद केले. यानंतर मार्नस लॅबुशेन फार काळ टिकू शकला नाही आणि 16 धावा करून फहीम अश्रफचा बळी ठरला. त्यामुळे ऑस्ट्रेलियाने 159 धावांवर दुसरी विकेट गमावली. यानंतर स्टीव्ह स्मिथ आणि वॉर्नरने मिळून ऑस्ट्रेलियाची धावसंख्या 238 धावांपर्यंत नेली. खुर्रम शहजादने स्मिथला (31) तंबूत पाठवले. ट्रॅव्हिस हेडने 40 धावांची झटपट खेळी करत ऑस्ट्रेलियाची धावसंख्या 300 च्या पुढे नेली. आमीर जमालने ट्रॅव्हिसची विकेट घेतली. 321 धावांवर ऑस्ट्रेलियाने वॉर्नरच्या रूपाने पाचवी विकेट गमावली. पहिल्या दिवशी पाकिस्तानचा मारा कमकुवत दिसला. ऑस्ट्रेलियाच्या फलंदाजांसमोर पाक गोलंदाज धावगती नियंत्रित करण्यात पूर्णपणे अपयशी ठरले. विकेटसाठी त्यांना झगडावे लागले. जमालने दोन, तर शाहीन, खुर्रम आणि फहीमने प्रत्येकी एक विकेट घेतली. या कसोटी सामन्यातून आमीर जमाल आणि खुर्रम शहजाद यांनी पाकिस्तानकडून पदार्पण केले. बाबर आझमने कर्णधारपद सोडल्यानंतर नवीन कर्णधार शान मसूदच्या नेतृत्वाखाली पाकिस्तानचा हा पहिलाच कसोटी सामना आहे. या खेळीदरम्यान डावखुऱ्या वॉर्नरने एक खास विक्रम आपल्या नावावर केला. आपल्या संस्मरणीय खेळीदरम्यान 13 वी धाव घेताच त्याने कसोटी करिअरमधील 8,500 धावा पूर्ण केल्या.

### स्मिथच्या पाकविरुद्ध एक हजार धावा

स्टीव्ह स्मिथने पाकिस्तानविरुद्धच्या कसोटी करिअरमध्ये 1000 धावा पूर्ण केल्या. त्याने पाकविरुद्ध 13 कसोटी सामन्यांच्या 20 डावांमध्ये 53.26 च्या सरासरीने 1,012 धावा केल्या आहेत. यात 8 अर्धशतके, 2 शतकांचा समावेश आहे. अशी कामगिरी करणारा तो ऑस्ट्रेलियाचा 9 वा फलंदाज ठरला आहे.

# MahaENews

The fight for truth... the right to democracy!

www.mahaenews.com | FRIDAY, 15th DECEMBER 2023 | Digital Edition | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


# Road Concreting in Pimple Gurav gets accelerated

## - Roads in the colonies will get finer within next four months; BJP City President Shankar Jagtap performs the Bhumi Pujan ritual

**Pimpri : Representative**

**Sachin Tendulkar, a simple boy from an ordinary family who barely had interest in studies becomes India's greatest cricketer. He is honored with the Bharat Ratna Award for his outstanding achievements in sports. Not everyone becomes this successful in life. However, if we cultivate interest in any sport, we develop sporting spirit and this way students will gain more self-confidence. This motivates to succeed in life. Jyoti Parihar, Assistant Deputy Director of Education expressed this valuable thought and teachers and parents should keep certainly this in mind.**







The administration should act from a positive perspective to provide Pimpri-Chinchwad citizens with good quality good roads and infrastructure. BJP City President Shankar Jagtap suggested that the concreting work of internal roads in Pimple Gurav and nearby housing societies and colonies should be completed in the next four months.

BJP city president Shankar Jagtap inaugurated the concreting work of internal roads in Bhimashankar Colony, Ganeshnagar, Vijayraj Colony in Pimple Gurav under 'D' Regional Office.

Former corporator Sagar Angolkar, Shashikant Kadam, former corporator Usha Munde, former accepted member Mahesh Jagtap, president of Ahilya Devi Seva Sangh Ajay Dudhbhate, president of BJP City Tribal Morcha Adv. Pandurang Korke, Anita Jadhav, Ratnamala Dudhbhate, Junior Engineer of MNC Swapneel Shirke, Deputy Engineer Sunildutt Narote, Ranjana Supe, Heera Virnak, Kalpana Bansode, Shanta Salunkhe, Lakshmi Gonde, Girija Bhojane, Anusaya Dhadwad, Seema Sable, Sangeeta Bhangre, Seema Mohite, Pradeep Samere, Subhash Mate, Ramesh Bhagare, Bhimdev Gonde, Tukaram Shingade, Praveen Mohite, Sunil Bhojane, Annasaheb Waghmode, Ajay Tilekar, Pandharinath Rane present on the occasion along with citizens of Bhimashankar Colony, Vijayraj Colony and Ganesh Nagar.

> Pimpri-Chinchwad city is moving towards becoming a 'Smart City' and various activities and projects are being undertaken by the Municipal Corporation, State Government and Central Government to improve the standard of living of the citizens. Main roads are being widened, linearly the internal roads of the city should be furnished. Road works should be done in every ward. We are following up with the municipal administration for the same. Instructions have been given to the administration that these works should be done on priority before the onset of monsoon.
>
> **-- Shankar Jagtap,,**
> BJP, City President, Pimpri-Chinchwad.



Shankar Jagtap said that Pimpri-Chinchwad Municipal Corporation administration has always taken positive initiative in constructing quality roads and infrastructure in the city. A time-bound program is now expected to develop roads in the newly incorporated areas. We will do our best to ensure that the administration meets the expectations of the local citizens while enabling infrastructure.